# ...तरच २०४७ पर्यंत 'विकसित भारत' शक्य

## राम माधव यांचे मत : गोखले इन्स्टिट्यूटमध्ये व्याख्यान

**पुणे, ता. १९ :** भारतीय असण्याचा सर्वांत उपयुक्त काळ आज आहे. आपण 'रोमँटिसिझम' बंद करून व्यावहारिक झाले पाहिजे. विश्वगुरू होता येत नाही, जग तुम्हाला विश्वगुरू म्हणते. त्यासाठी ती पात्रता मिळवावी लागते. त्यामुळे एकात्मता, संपन्नता, सुरक्षितता, प्रतिष्ठा या चार घटकांवर काम केल्यास २०४७ पर्यंत भारत 'विकसित भारत' होईल, असे मत भारतीय जनता पक्षाचे माजी सरचिटणीस राम माधव यांनी व्यक्त केले.

गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेतर्फे व पुणे इंटरनॅशनल सेंटर आणि प्रवाह यांच्या सहकार्याने'उदयोन्मुख जगामधील भारताची भूमिका'या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. संस्थेच्या काळे सभागृहात आयोजित कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. अजित रानडे या वेळी उपस्थित होते. राम माधव यांनी बदलती जागतिक परिस्थिती, चीनचा प्रभाव, जागतिक पातळीवर भारताचे स्थान या अनुषंगाने भाष्य केले.

अमेरिका किंवा पाश्चात्त्य देशांचा कमी होणारा प्रभाव, लष्करी आणि आर्थिक महासत्ता चीनचा उदय, जगात शीतयुद्ध सदृश परिस्थिती वाढणे, जगात छोट्या छोट्या देशांची शक्ती वाढणे, बहुपक्षीय संस्थांचे महत्त्व कमी होणे, बहुराष्ट्रीय कंपन्या, जागतिक स्वयंसेवी संस्था, दहशतवादी गट यांचा प्रभाव वाढणे हे नव्या जगाचे महत्त्वाचे घटक असल्याचे माधव यांनी सांगितले.

प्रास्ताविक करताना डॉ. रानडे म्हणाले, ''जगातील अर्थकारणामध्ये चीनचा उदय हा जगभरात विविध पातळीवर भीती किंवा धोका निर्माण करणारा वाटतो. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेचा उदय कुठेही अशाप्रकारची भीती निर्माण करत नाही. या परिस्थितीत भारताच्या उन्नतीला सगळीकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात आहे.''



**गोखले इन्स्टिट्यूट, आगरकर रस्ता :** 'उदयोन्मुख जगामधील भारताची भूमिका' या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलताना (डावीकडून) डॉ. अजित रानडे आणि डॉ. राम माधव.

### माधव म्हणाले...

अमेरिका आणि चीन यांच्यातील स्पर्धा आर्थिक व लष्करी शक्तीपेक्षा तंत्रज्ञान विकसन, नवनिर्मितीची आहे.

येत्या वर्षात मानवाची जागा तंत्रज्ञान घेईल, हुशार तंत्रज्ञानाचा काळ येईल. त्यामुळे नवे जग तंत्रज्ञानाधिष्ठित असेल.

हवामान बदलांमुळे १.२ अब्ज लोकांचे विस्थापन होण्याची शक्यता आहे.

भारतीयांनी 'रोमँटिसिझम' बंद करून व्यावहारिक झाले पाहिजे. राजनैतिक स्वायत्तता महत्त्वाची आहे.

पुढील दहा वर्षांसाठी अर्थव्यवस्थेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कारण, पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होऊनही भारत विकसनशील देशच राहणार आहे.